# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ: एक अभ्यास

**मिनाक्षी गंगाधर मिणचे**, संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना:**

समाज व्यवस्थेतील चातुवर्ण व्यवस्थेत अतिशुद्र समजणाऱ्या डोंगर कपाऱ्यामध्ये वास्तव्यास असणारा भारताचा घटक असलेला हा अनुसूचित जमाती (आदिवासी) समाज वनवासी या नावाने ही संबोधला जातो. शिक्षण, विकास यापासून वंचित असल्याने हा मागासच राहिला शिवाय इतर वर्गाच्या तुलनेत यांची संख्या ही कमी व विखूरलेली असल्याने विकासाची कोणतीही संधी यांच्यापर्यंत पोहचत नव्हती. अनेक समाजसुधारकांच्या अथक परिश्रमातून आदिवासी समाजात चेतना निर्माण केली. किमान शिक्षणाची सुरुवात केली. इतर घटकाच्या सर्पकांत आणून विकासाच्या दृष्टीने प्रेरित केले. यामध्ये समाजसुधारकाबरोबर शासनाने ही पुढाकार घेतला आश्रमशाळा, मुलभूत सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला यासाठी विशेष रक्कमेची तरतुद करणे अशा घटकावर भर दिला आणि या वंचित समाजाला विकासाकडे आकर्षीत करण्याचा प्रयत्न केला. यामधील एक भाग म्हणून शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ:**

अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) विकासासाठी तत्कालीन मुख्यमंत्री नारायण राणे यांच्या कार्यकिर्दीत आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र शासन कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये १५ जाने १९९९ रोजी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे.

आदिवासी समाजाची शोषण व पिळवणुकीतून सुटका व्हावी. समाजात त्यांना इतराच्या बरोबरीचे स्थान मिळावे याकरीता सदरचे महामंडळ कार्यरत आहे. यामध्ये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल २०० कोटी इतके आहे. तर केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडून भागभांडवल प्राप्तीचे प्रमाण केंद्र शासनाकडून ४९ टक्के तर राज्यशासनाकडून ५१ टक्के इतके होते. पण सध्या हया भागभांडवलात वाढ करुन राज्यशासनाचे रु १०२कोटी, केंद्रशासनाचे रु.९८ कोटी इतक्या रक्कमेचा भागभांडवलाचा भरणा करावयाचा आहे.

आदिवासी समाजाकरीता कार्यरत असलेल्या सदरच्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय हे नाशिक येथील आदिवासी विकास भवन—२ रा मजला रामगणेश गडकरी चौक, जूना आग्रा रोड नाशिक येथे कार्यरत आहे. तर याची प्रादेशिक कार्यालये ही कार्यरत आहेत. शिवाय लोकसंख्येच्या प्रमाणानुसार उपप्रादेशिक कार्यालये ही निर्माण केली आहेत. महाराष्ट्रात साधारणत: अशी ११ कार्यालये कार्यरत आहेत. या कार्यालया अंतर्गत अधिनस्थ कार्यक्षेत्रा अंतर्गत जिल्हयाचा समावेश केला आहे. यामध्ये जून्नर या शाखा कार्यालया अंतर्गत दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे या जिल्हयाचा समावेश केला आहे तर आदिवासी लोकसंख्या जास्त असणारे गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नंदुरबार अशा जिल्हयामध्ये स्वतंत्र शाखा कार्यालये ही निर्माण केली आहेत.

साधारणत: शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ हे आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या नियत्रंण व देखरेखीखाली कार्य करते. पदानुक्रमे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, उपसचिव, आयुक्त, व्यवस्थापकीय संचालक अशा पदपरंपरेच्या रचनेनुसार महामंडळाची कार्यपध्दती कार्यान्वीत होत आहे. सदर महामंडळाचे कार्य हे दोन प्रमुख उद्दिष्टावर आधारित असल्याचे दिसून येते ते पुढील प्रमाणे आहे,

**उद्दिष्टये:**

१) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ अनुसूचित जमातीतील व्यक्तीच्या विकासासाठी आर्थिक मदतीद्वारे त्यांना सक्षम बनवते.

२) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ आदिवासी महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबवते.

**गृहितके:**

१) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ आदिवासीच्या आर्थिक विकासासाठी कर्ज रुपाने आर्थिक मदत करते.

२) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ आदिवासी महिलांसाठी देखील आर्थिक कर्ज देऊन त्यांना सक्षम बनविण्याचा प्रयत्न करते.

**अभ्यास पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंध हा प्रथम व दुय्यम साधनावर आधारीत आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माहिती पत्रकाच्या अनुसूचित जमातीकरिता संबंधीत योजना कार्यक्रमाच्या माहितीपत्रकाचा, पुस्तकांचा तसेच संदर्भ ग्रंथाचा वर्तमानपत्र, इंटरनेट यांचा वापर सदर संशोधनासाठी केलेला आहे.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या योजना:**

**१) मुदती कर्ज योजना:** केंद्र स्तरावरील राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ नवी दिल्ली याच्यांमार्फत गुंतवणूक मर्यादेच्या ७५ किंवा ८५ टक्के रक्कमेचा सहभाग शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत १० ते १५ टक्के रक्कमेचा सहभाग, लाभार्थ्यांना स्वत:चा ५ टक्के रक्कमेचा सहभाग समाविष्ठ करावा लागतो. याअंतर्गत साधारणत: १ ते २५ लाखापर्यंतचे लाभार्थी व्यवसायाच्या स्वरुपानुसार कर्ज उपलब्ध करुन दिले जात आहे. सदर कर्जावर वितरीत रक्कमेनुसार अनुक्रमे ४ ते १० टक्के पर्यंतचा व्याजदर आकारला जातो सदर कर्जाची परत फेड ही ५ वर्षात २० समान हप्त्यात करावी लागते. शासनाने या सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत ३०५ लक्ष रक्कमेचे कर्ज रुपाने वितरत केले आहे आणि १५२ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ उपलब्ध करुन दिला आहे. या अंतर्गत लाभार्थ्यांनी वाहन खरेदी ढाबा व्यवसाय, वर्कशॉप व ॲटो गॅरेज यासारख्या व्यवसायाची उभारणी केली असून समाधानकारकरित्या उत्पन्न मिळवित असल्याचे स्पष्ट केले.

**२) महिला सशक्तीकरण योजना:** केंद्र स्तरावरील एन.एस.टी. एफ.डी.सी. यांच्यामार्फत गुंतवणूक मर्यादेच्या ८० टक्के रक्कमेचा सहभाग शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा २० टक्के रक्कमेचा सहभाग समाविष्ट करुन महिलांना १ लाख पर्यंतचे अर्थसहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन दिले जात आहे. या कर्जाच्या रक्कमेवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो. तर या सदर रक्कमेची परतफेड ही ५ वर्षाच्या कालावधीत करावी लागते. या सदर योजनेअंतर्गत ९६२ लक्ष रु. रक्कमेचे वितरण शासनामार्फत झाले आहे व ४८१ महिला लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेवून विविध व्यवसायाची उभारणी केल्याचे निर्देशनास आले.

**३) राष्ट्रीयकृत बँक सहकार्याने कर्ज योजना:** ५०,०००/— किंवा यापेक्षा अधिक रक्कमेचे कर्ज वितरण सदर योजनेअंतर्गत गुंतवणूक मर्यादेच्या ७५ टक्के रक्कमेचा सहभाग हा स्थानिक पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकामार्फत वितरीत केला जात आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा २० अथवा १५ टक्के रक्कमेचा सहभाग तर स्वत: लाभार्थ्यांचा ५ टक्के सहभाग समाविष्ट करुन कर्जाचे वितरण होत असल्याचे दिसते. यामध्ये महामंडळामार्फत वितरीत रक्कमेवर द.सा.द.शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो तर बँक वितरीत कर्जावर बँक नियमाप्रमाणे व्याजदाराची आकारणी केली जाते सदर योजनेअंतर्गत १२८ लाभार्थ्यांना लाभ उपलब्ध करुन दिला आहे व आर्थिकदृष्टया सबळ सक्षम बनविले आहे.

एकंदरीतच महामंडळामार्फत सदरच्या तिन्ही योजना राबविल्या जात असून या अंतर्गत अनेक कुटुंबाना या योजनाचा लाभ घेता आला त्याद्वारे विविध व्यवसायाची उभारणी करुन आर्थिक दृष्टया समाधान कारक उत्पन्न मिळविता आल. स्वावंलबी जीवनाचा मार्ग हा उपलब्ध झाला आहे. पण सदर योजनाचा लाभ हा केवळ पूणे व नगण्य स्वरुपात सोलापूर

जिल्हयापुरतेच मर्यादित असलेला दिसून आला. वास्तविक आदिवासीच्या प्रत्येक व्यक्ती/कुटुंबापर्यंत या योजनाचा लाभ पोहचावा यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे दिसून आले.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची वैशिष्टये:**

१) लोकांचा सहभाग
२) क्षेत्रीय परिवर्तन
३) गुणात्मक स्वरुपाची संकल्पना
४) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

उपरोक्त वैशिष्टयासह शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने भरीव स्वरुपाची कामगिरी पार पाडली आहे.

**कार्य:**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने सीापनपासून आजपर्यत

१) ४८१ महिलांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले.
२) १५२ लाभार्थ्यांना व्यवसाय उभारणीस मदत केली.
३) १२८ लाभार्थ्यांना व्यवसाय उभारणीतून स्वावलंबी बनविले.

एंकदरीतच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने आदिवासी कल्याणाचा हेतू डोळयासमोर ठेवून केवळ समानता निर्माण करण्यावर भर न देता आदिवासींना सबळ, सक्षम, स्वावलंबी जीवनाचा लाभ उपलब्ध करुन दिला आहे व आदिवासी विकासामध्ये मोलाची भूमिका पार पाडली आहे.

**निष्कर्ष:**

१. आदिवासी विकासाची गरज लक्षात घेवून शासनाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत.
२. आदिवासी कल्याण हा हेतू डोळयासमोर ठेवून आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली आहे.
३. शासनाने महिला सशक्तीकरणावर भर दिला आहे.
४. सर्व स्तरातील आदिवासीचा विचार या महामंडळद्वारे केला आहे.
५. एंकदरीतच आदिवासीच्या सर्व अडचणीची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**समारोप:**

एकंदरीतच आदिवासीच्या परिस्थितीचा आढावा घेता. ती समाधान कारक नव्हती अज्ञान, अंधश्रध्दा डोंगर समाज प्रवाहापासून अलग होती म्हणूनच अनेक समाजसुधारकांनी पुढाकार घेवून वाडया वस्त्यापर्यंत पोहचून जागरुकता निर्माण केली. आदिवासी समाजाला प्रेरणा दिली. विविध योजना, कार्यक्रम राबविले शिवाय शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ निर्माण केले आणि आदिवासीची सक्षमतेकडे वाटचाल घडवून आणली आहे.

विकासापासून चार हात लांब दयनीय अवस्थेतील आदिवासी अनेक समाजसुधारकांच्या अथक प्रयत्न व परिश्रमातून जागृकतेकडे वाटचाल करीत असलेले दिसून आले. पण शिक्षणाच्या अभावाने आर्थिकदृष्टया परांवलबी जीवन जगत होते. या जाणिवेतून शासनाने अनेक योजना राबविल्या यामधीलच एक भाग म्हणून विविध कल्याणकारी योजना व कार्यक्रमाद्वारे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ निर्माण केले. विशिष्ट उद्दिष्टये, योजना, कार्यक्रम डोळयासमोर ठेवून कार्यरत राहिली. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्वत:ची अशी वैशिष्टये निर्माण केली. महाराष्ट्रातील प्रत्येक आदिवासी व्यक्तींना सामावून घेतले व त्याच्या जीवनाची वाटचाल सक्षमतेकडे करण्यात प्रेरीत केले हेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे श्रेय म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

१) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची माहिती पुस्तिका.
२) लाभार्थ्यांची मुलाखत